# मुंबई विद्यापीठ

**मुंबई विद्यापीठाच्या "कुलगुरु" पदासाठी निवड व शोध समिती अर्ज मागवित आहे.**

मुंबई विद्यापीठाची स्थापना 1857 साली झाली असून हे भारतातील नामवंत व जुन्या विद्यापीठांपैकी एक आहे. विद्यापीठाचे मुख्य परिसर फोर्ट आणि विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई येथे असून विद्यापीठाची उपकेंद्रे ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग येथे आहेत. मुंबई विद्यापीठ हे विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, 1956 कलम 2 (एफ) आणि 12 (बी) अंतर्गत मान्यताप्राप्त तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मध्ये घटित केले असून सद्यःस्थितीत मुंबई विद्यापीठामध्ये 54 विभाग/संस्था/केंद्र/विशेष उपक्रम केंद्रे, पाच स्वायत्त विभाग, एक घटक महाविद्यालय व दोन आदर्श महाविद्यालय कार्यरत आहेत. या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग असे एकूण सात जिल्हे आहेत आणि सदर जिल्हयांमधील जवळपास 852 महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत, त्यापैकी 54 स्वायत्त महाविद्यालये असून 8 लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. विद्यापीठाबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 तसेच सदर अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक 24 डिसेंबर, 2022 रोजी निर्गमित करण्यात आलेल्या अधिनियमानुसार कुलगुरू पदाची शैक्षणिक अर्हता व निवडीची पारदर्शक पध्दत नमूद करण्यात आली आहे.

मा. कुलपती तथा राज्यपाल, महाराट्र राज्य यांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठी सुयोग्य व्यक्तींच्या नावाची शिफारस करण्यासाठी चार सदस्यीय निवड व शोध समिती गठीत केली आहे. सदर समितीव्दारे कुलगुरूंच्या पदासाठी विहित केलेली अर्हता आणि अनुभव या अटींची पूर्तता करणा—या नामांकीत शिक्षणतज्ज्ञांकडून नामनिर्देशने/अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हता व अनुभव याबाबतची आवश्यक ती तपशीलवार माहिती तसेच अर्जाचा नमूना आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 च्या कलम 11 चा उतारा मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कुलगुरू पदासाठी इच्छुक व्यक्तींनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यानुसार आपली तपशीलवार माहिती, स्वतःच्या उमेदवारीबाबतचे समर्थन, विद्यापीठाकरिता भविष्यलक्षी योजना आणि स्वतःच्या कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकीत व्यक्तींची नावे, संपर्क तपशील, संदर्भपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.  विद्यापीठे/संस्थानांदेखील या पदासाठी सुयोग्य व्यक्तींचे नामनिर्देशन करता येईल.

आवश्यक पात्रता आणि अनुभवाची पूर्तता करणारे आणि जबाबदारी स्विकारण्यास इच्छुक उमेदवार अर्ज करतांना अर्जासोबत संकेतस्थळावर उपलब्ध (1) तपशिलांचा सारांश ( परिशिष्ट 1) (2) ना हरकत व चारिन्र्य पडताळणी प्रमाणपत्र (परिशिष्ट 2) नमुन्यातील कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील अर्जामधील माहिती भरून अर्हता व अनुभवाची कागदपत्रे जोडून आपली योग्यता तसेच मुंबई विद्यापीठासंबंधीची भविष्यवेधी भूमिका दर्शविणारे प्रत्येकी दोन पृष्ठांचे लेखन आणि तीन शिफारशीसह एकूण चार प्रतींमध्ये टपालाव्दारे तसेच सॉफ्ट प्रत ईमेलव्दारे समन्वय अधिकारी यांच्याकडे मुद्रित प्रत डाक किंवा कुरिअरने एका बंद लिफाफ्यावर 'कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई या पदासाठी अर्ज' असे ठळक आणि सुवाच्च अक्षरात लिहून खाली निर्देशित नोडल अधिका-याच्या पत्त्यावर दिनांक 15 एप्रिल, 2023 रोजी किंवा त्यापुर्वी पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.

| | |
|---|---|
| समन्वय अधिकारी | प्रा.अविनाश सी. पांडे<br>संचालक<br>आंतर विद्यापीठ प्रवेगक केंद्र (आय.यु.ए.सी.)<br>अरूणा असफ अली मार्ग<br>फोर्टीस हॉस्पीटल जवळ, वसंत कुंज<br>नवी दिल्ली 110 067 |
| ई मेल | nodalofficer.muvc2023@iuac.res.in<br>cc: nodalofficer.muvc2023@gmail.com |
| दुरध्वनी | +91-11-24126036 |

संस्थासुध्दा योग्य उमेदवारांचे नामनिर्देशन करू शकतील. तथापि, अशा सर्व उमेदवारांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती 15 एप्रिल 2023 रोजी किंवा त्यापुर्वी नोडल अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अर्हता व अनुभवाची कागदपत्रे जोडून एकूण चार प्रतींमध्ये पाठविणे आवश्यक आहे.

उमेदवाराचे अर्ज छाननी केल्यानंतर विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी पात्र आणि योग्य असणाऱ्या अशाच उमेदवारांना शोध व निवड समितीशी संवाद साधण्यासाठी आमंत्रित केले जाईल. मात्र, किमान अर्हता पूर्ततेने उमेदवारास मुलाखतीस बोलाविले जाण्याचा हक्क प्राप्त होतोच असे नाही.

कुलगुरू शोध व निवड समितीच्या कार्य व प्रक्रियेसंदर्भातील सर्व पत्रव्यवहार केवळ समन्वय अधिकारी यांच्याकडेच करावा. या संदर्भात कुलगुरू शोध व निवड समिती अध्यक्ष अथवा सदस्य यांच्याशी कोणीही संपर्क करू नये. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज/नामनिर्देशन विचारात घेतले जाणार नाहीत.

अध्यक्ष

दिनांकः 13 मार्च 2023

निवड व शोध समिती